# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ ५६१ /२०१८ दि. २३/०२/२०१८

## परिपत्रक

**विषय - दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ हा 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहाने व गांर्भीर्यपुर्वक साजरा करण्याबाबत.**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी साहित्याचा मानदंड वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कुसूमाग्रज यांचा जन्मदिवस, "मराठी भाषा दिवस" म्हणुन साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी "मराठी भाषा दिवस" साजरा करावयाचा असुन विविध उपक्रम योजुन महाविद्यालयानी स्वंयस्फूर्तीने सहभागी व्हावे तसेच आयोजन करावे. सदर कार्यक्रम आयोजनाचा व उपक्रमांचा अनुपालन अहवाल unicode.vinodtawde@gmail.com या ई-पत्त्यावर परस्पर सादर करावा.

'मराठी भाषा गौरव दिनाच्या' कार्यक्रमासाठी व विविध उपक्रमासाठी आपण सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :- उपरोक्तप्रमाणे.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. संचालक, पी. जी. टी. डी. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

F:\BBDD\LATTER\Circular/205

जा.क्र.मंत्री/शा.शि.,क्री.यु.क.,उ.तं.,म.भा.,सां.का.,अ.वि.व व.,
टिप्पणी क्र. ८७ /२०१८ दिनांक : ०६.०२.२०१८.


**विनोद तावडे**

**मंत्री**

**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**

महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक : ६.०२.२०१८

सस्नेह नमस्कार!

**आपणा सर्वांना मराठी भाषा गौरव दिनाच्या खूप शुभेच्छा!** ज्येष्ठ कवी व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस दि. २७ फेब्रुवारी, हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून, शासनाच्या वतीने विविधांगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी, आपण **'चलभाषावर (मोबाईलवर) मराठी'** आणि **'संगणकावर मराठी'** या विषयांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. मराठी भाषेचा विकास साधण्यासाठी चलभाषावर व संगणकावर मराठीचा वापर वाढणे अत्यावश्यक आहे.

'बोलू तसे टंकलेखन (स्पीच-टु-टेक्स्ट) करणाऱ्या' लिपिकार आणि फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या स्वरचक्र या विनामूल्य अ‍ॅप्सच्या माध्यमातून मराठीतून टंकलेखन करता येणं सहज शक्य आहे. तसेच संगणकावर मराठीसाठी युनिकोड आधारित मराठीची उत्तम सुविधा उपलब्ध आहे.

मराठी भाषा गौरव दिनी, महाराष्ट्रातील सर्व ग्रंथालये, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा यांचे संस्थाप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी **चलभाषावर (मोबाईलवर) मराठी कार्यान्वित करावी. तसेच संगणकावर युनिकोड-मराठी सुरू करून, मला unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर टंकलिखित संदेश पाठवावा**, असे आग्रही आवाहन मी करीत आहे. त्याचबरोबर आपण आपल्या संस्थेत मराठी अभिमान गीताचे समूह गायनही करावे. (सोबतच्या उपक्रम सूचीत तपशील दिला आहे.)

सर्व प्रमुखांनी आपल्या अधीनस्त असणाऱ्या सर्व संस्थांना याबाबत अवगत करावे व त्याचा अनुपालन अहवाल इ-टपालाद्वारे मला पाठवावा. प्राचीन भाषांपैकी एक असलेल्या आणि भारतातील अधिकृत भाषांपैकी एक असलेल्या मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल, याची खात्री आहेच.

**सहपत्र — उपक्रमांची सूची.**

आपला,

(स्वाक्षरी)

**(विनोद तावडे)**

# दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ : मराठी भाषा दिन — उपक्रम सूची

## पहिल्या तीन उपक्रमांना विशेष प्राधान्य द्यावे.

१. **'मोबाईलवर मराठी'** -

- बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) **लिपिकार** या मुक्त ॲपच्या माध्यमातून **मोबाईलवर मराठीतून टंकलेखन** आणि **स्वरचक्र** या फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मराठीतून मोबाईलवर टंकलेखन करा.
- लिपीकारसारखे मराठी वॉईस टायपिंग कीबोर्ड, स्पीचनोटस्, हियर टु रीड मराठी, वॉइस टु टेक्स्ट, मराठी की बोर्ड असे ॲप्सचे **अनेक पर्याय** "बोलू तसे मराठी टंकलेखन" करण्यासाठी **उपलब्ध** आहेत.
- स्वरचक्रप्रमाणे स्पर्श, पाणिनी, गुगल इंडीक असे ॲप्सचे अनेक पर्याय मराठी टंकलेखन करण्यासाठी उपलब्ध आहेत.

२. **'संगणकावर मराठी'** -

- संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा आणि unicode.vinodtawde@gmail.com वर मराठीतून (देवनागरी लिपी) मेल पाठवा.
- **मेल पाठवण्याची कृती-**
- महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्र पाहा. त्यानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.
- युनिकोड मराठीत टंकलेखन करून unicode.vinodtawde@gmail.com या इ- पत्त्यावर मा. ना. श्री. विनोद तावडे, मराठी भाषा मंत्री यांना यथोचित संदेश पाठवा.

३. **शाळा व महाविद्यालयांमध्ये एकाच वेळी मराठी अभिमान गीत गायन.**

- कवी सुरेश भट यांनी लिहिलेल्या व संगीतकार कौशल इनामदार यांनी संगीतबद्ध केलेल्या **"लाभले आम्हास भाग्य" या गीताचे समूह गायन** करा.
(सकाळ सत्र सकाळी ११ वाजता व दुपार सत्र दुपारी ४ वाजता)

४. मराठी भाषेसंबंधित विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे. तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

५. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

६. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.

७. युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

८. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

९. कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.

१०. सन २०१७ – १८ हे वर्ष कविवर्य विंदा करंदीकर यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने, विंदांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करावे.

११. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

१२. मराठीतील कोश वाङ्‌मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

१३. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

१४. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

१५. म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती – या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

१६. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

१७. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

१८. मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन

१९. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी अत्युच्च त्यागासह कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

२०. इयत्ता १० वी व इ.१२ वी च्या परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

२१. पुस्तकांचं गाव - भिलार (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या महाराष्ट्र शासनाच्या अभिनव प्रकल्पाविषयी माहिती देणे. तसेच पुस्तकांच्या गावास भेट देणे.

---

**टीप :** आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमुद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन




२७ फेब्रुवारी

# मराठी भाषा गौरव दिन